# <u>सायबर गुन्हे, गुन्हे शाखा, मुंबई यांचेकडून जनतेस आवाहन करण्यात येते की,</u>

# <u>नवीन वर्ष व ख्रिसमसच्या अनुषंगाने हॉटेल–रेस्टॉरंट बुकिंग, ऑनलाईन जेवण व वाईन शॉप च्या बनावट जाहिरातींपासून सावधान</u>

नवीन वर्ष व ख्रिसमसच्या अनुषंगाने नागरीकांकडुन मोठ्या प्रमाणात ऑनलाईन हॉटेल–रेस्टॉरंट बुकींग, जेवण, वाईन ऑर्डर केले जातात. फेसबुक व इतर सोशल मिडीयाच्या माध्यमांतुन प्रतिष्ठीत, नावलौकीक हॉटेल्स–रेस्टॉरंट चा वापर करून बुकींग मध्ये सवलत, एका थाळीवर दोन थाळी मोफत अशा प्रकारच्या खोट्या जाहीराती दिल्या जातात. इंटरनेट माध्यमावर सायबर गुन्हेगांरानी गुगल एडिटचा वापर करून प्रसिद्ध वॉईन शॉप, रेस्टॉरंट, हॉटेल्सचे नंबर यामध्ये बदल करुन ऑनलाईन फसवणुक केल्याच्या घटना घडलेल्या आहेत. त्यामुळे येणारे नवीन वर्ष व ख्रिसमसच्या पार्श्वभुमीवर ऑनलाईन बुकींग करताना सावधानता बाळगावी.

- ऑनलाईन माध्यमातून हॉटेलस्, लॉजेस, रेस्टारंट बुकींग करताना किंवा जेवण ऑर्डर करताना त्या वेबसाईट अधिकृत असल्याची खात्री करावी तसेच त्यावर देण्यात आलेल्या संपर्क क्रमांकाची खात्री करूनच ऑर्डर द्यावी.
- यापूर्वी नवीन वर्ष व ख्रिसमसच्या पार्श्वभुमीवर बनावट लोभस ऑनलाईन जाहिरातीद्वारे फसवणुकीच्या प्रकार घडलेले आहेत. त्यामुळेच Facebook, whatsapp व इतर Social Media वर येणाऱ्या Offers च्या Link वर Click करू नये. तसेच अशा संकेतस्थळावरती देण्यात आलेले फॉर्ममध्ये कोणतीही वैयक्तिक माहिती देऊ नये.
- आपल्या बॅक खात्याशी संबंधित गोपनीय माहिती कोणाशीही शेअर करू नये किंवा ओ.टी.पी. शेअर करू नये. त्याद्वारे आपल्या संदर्भात ऑनलाईन फ्रॉड होवुन आर्थिक नुकसान होण्याचा धोका संभवतो.
- **Cyber fraudster** यांनी **<u>Any Desk, Team Viewer</u>** अश्या प्रकारच्या लॅपटॉप, मोबाईलची स्क्रिन शेअर करणारी ॲप्लीकेशन डाऊनलोड करण्यास सांगितल्यास ती करू नये. त्याद्वारे आपल्या मोबाईलमध्ये आपण करीत असलेल्या सर्व कृती Cyber fraudster ला कळुन तो आपली गोपनिय, संवेदनशिल माहिती मिळवुन त्याचा गैरवापर करण्याचा व फसवणुक होण्याचा धोका संभवतो. त्यामुळे अश्याप्रकारची मागणी करणाऱ्या Cyber fraudster चा मोबाईल क्रमांक तात्काळ ब्लॉक करावा.
- Cyber fraudster सुरवातीस **<u>Q.R. Code</u>** स्कॅन करण्यास सांगुन आपल्या खात्यावर ०१ रूपये जमा करतात व नंतर आपल्या खात्यातून रक्कम काढुन घेतात त्यामुळे असे कोणतेही **<u>Q.R. Code</u>** स्कॅन करू नये.
- अशाप्रकारे कोणाची फसवणूक झाल्यास किंवा फसवणूकीचा प्रयत्न झाल्यास सदरबाबत तात्काळ स्थानिक पोलीसांशी संपर्क साधावा.